# विश्व साहित्य संमेलन आता ऑनलाईन!

**प्रतिनिधी**
पुणे

टोरांटो येथील विश्व साहित्य संमेलनाचे वाद, आर्थिक पेच, मानापमान आणि अविश्वासाच्या वातावरणात रहित झाल्याची घोषणा यांना छेद देत नव्याने विश्व साहित्य संमेलन भरले आहे. बुकगंगा डॉट कॉमतर्फे www.vishwasahityasammelan.org या संकेतस्थळावर हे दहा दिवसांचे संमेलन होत आहे.

हे ऑनलाईन विश्व साहित्य संमेलन २४ तास सुरू राहणार असून त्यावर चर्चासत्रे, कविसंमेलन, पुस्तकांची यादी आणि ब्लॉगर्सची माहिती एकत्रित स्वरुपात मिळणार आहे, अशी माहिती या संमेलनाचे संयोजक मंदार जोगळेकर यांनी दिली. संमेलनाचे अध्यक्षपद आणि विविध पुरस्कारांची निवडही पर्याय सुचवून ऑनलाईन केली जाणार आहे. जगभरातील लेखक, प्रकाशक, ब्लॉगर, वाचक, विद्यार्थी आणि माध्यमे या सर्व घटकांना संमेलनात थेट सहभाग घेता येणार आहे. आवडता लेखक, कवी, प्रकाशक आणि ब्लॉगरसाठी पुरस्कार देण्यात येणार असून फेसबुकवरही पेजच्या माध्यमातून हे संमेलन उपलब्ध होणार आहे.

आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून मराठी साहित्याचा प्रचार आणि प्रसार करणे, जगभरातील साहित्यिकांना सामायिक व्यासपीठ उपलब्ध करणे, साहित्य क्षेत्रात सकारात्मक वातावरण निर्माण करणे, मराठीमध्ये प्रकाशित होणाऱ्या पुस्तकांची माहिती जगभरातील वाचकांपर्यंत पोहोचविणे आणि लेखकांच्या सर्व पुस्तकांची नोंद करून त्यांचे साहित्य जतन करणे, ही या संमेलनाची उद्दिष्टे असल्याचे मंदार जोगळेकर यांनी सांगितले.